# मुंबई विद्यापीठ

क्र. घ. म./ ०८ /२०१५–२०१६

संदर्भः–१) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./४८/२००९ दिनांक ३१ जानेवारी २००९
२) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./७३/२०१० दिनांक १६ एप्रिल, २०१०
३) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./५५/२०११ दिनांक १० मार्च, २०११
४) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./९५/२०११ दिनांक ३० मे, २०११
५) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./३७७/२०११ दिनांक ८ नोव्हेंबर २०११
६) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./०१/२०१२ दिनांक २१ जानेवारी, २०१२
७) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./१२/२०१२ दिनांक २८ मे, २०१२
८) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./३७/२०१२ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३
९) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./१५/२०१४–२०१५ दिनांक १५/०९/२०१४
पहावे.

परिपत्रक :–

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, प्राचार्य व रिक्त शिक्षकांची पदे महाविद्यालयांमध्ये प्राधान्याने भरावीत असे विद्यापीठामार्फत वेळोवेळी परिपत्रके निर्गमित करुन कळविण्यात आलेले असून सुध्दा बऱ्याच महाविद्यालयांनी याबाबत अदयापपर्यंत कार्यवाही केलेली नाही असे निदर्शनास येत आहे.

विद्यापीठाने निर्गमित केलेले विद्यापीठ परिपत्रक क्र. घ.म./१५/२०१४–२०१५ दिनांक १५/०९/२०१४ अन्वये महाविद्यालयाने प्राचार्य व शिक्षकांची पदे भरली नाहीत तर विद्यापीठ कायदा १९९४ कलम (९१) अन्वये कडक कारवाई करण्यात येईल अशी सक्त ताकोद देऊन सुध्दा महाविद्यालये सदर पदे भरण्याची कार्यवाही करण्याची बाब गांभीर्याने घेत नाहीत असे दिसून येत आहे.

सदरबाबत शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे–१, यांनी पत्र क्रमांक. अमवि/२०१५/प्राचार्यरिक्तपदे/मवि–२ दि. १०/११/२०१५ अन्वये सूचित केलेले आहे की, प्राचार्यांच्या रिक्त पदांबाबत अधिवेशनामध्ये वारंवार तारांकित प्रश्न, कपात सूचना, लक्षवेधी सूचना, अतारांकित प्रश्न उपस्थित केले जातात. तरी सदर पदे भरण्याबाबत संस्थाचालक यांना सूचित करावे.

या अनुषंगाने, संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना सूचित करण्यात येते की, ज्या महाविद्यालयांमध्ये नियमित प्राचार्य पद भरलेले नाही अशा महाविद्यालयांमध्ये नियमित प्राचार्यांची रिक्त पदे प्रथम प्राधान्याने भरण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करण्यात यावी व तसा विद्यापीठामार्फत शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना रिक्त पदांचा आढावा दर महिन्याला पाठविणे आवश्यक असल्यामुळे सदरबाबतच्या केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास खालील पत्त्यावर १ महिन्याच्या कालावधीत विनाविलंब कळविण्यात यावा. जी महाविद्यालये या परिपत्रकानुसार कार्यपुर्ती अहवाल सादर करणार नाहीत अशा महाविद्यालयांवर विद्यापीठ कायदा १९९४ अन्वये कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

घटक महाविद्यालये व संस्था कक्ष,
खोली क्रमांक – २०४/२०५,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
मुंबई – ४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२–२२७०८७४१
ईमेलआयडी – concolsection@gmail.com

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– ५ डिसेंबर, २०१५

(डॉ. अनिल पाटील)
(प्रभारी कुलसचिव)
मुंबई विद्यापीठ